**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

मुंबईस्थित विविध देशांच्या दुतावासात नियुक्त होणा-या/कार्यरत असलेल्या राजनैतिक अधिका-यांच्या पाल्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध अभ्यासक्रमास संबंधित शैक्षणिक वर्षात प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर प्रवेश घेण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्याबाबतचा सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांनी निर्गमित केलेला शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२२/तांशि-४, दि.०७ नोव्हेंबर, २०१७ आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/Cउपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.
संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ [illegible] 150 - [illegible]
दि.: 19 DEC 2017

मुंबईस्थित विविध देशांच्या दुतावासात नियुक्त होणाऱ्या / कार्यरत असलेल्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या पाल्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध अभ्यासक्रमास संबंधित शैक्षणिक वर्षात प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर प्रवेश घेण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्याबाबत...

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ७ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ : १) अपर मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी (तत्कालीन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक CEP-१६१६/१६/XXX, दि.१/१२/२०१६
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१७/२२१, दि.०६/०३/२०१७

**प्रस्तावना :** राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ अंतर्गत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत केले जातात व या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येते. पार्श्वनाथ चॅरिटेबल ट्रस्ट व इतर विरुध्द अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व इतर या न्यायालयीन प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांचे वेळापत्रक निश्चित करुन दिले असून त्यानुसार प्रत्येक शैक्षणिक वर्षातील प्रवेशाचा अंतिम दिनांक ( कट ऑफ डेट ) ३१ ऑगस्ट असा आहे. त्यामुळे केंद्रिय शिखर परिषदेच्या अखत्यारीतील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना सदर दिनांकानंतर भारतातील विविध देशांच्या दुतावासात नियुक्त होणाऱ्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या पाल्यांना अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश घेणे शक्य होत नाही. तसेच राज्यातील विविध विद्यापीठे व त्यांच्या अखत्यारितील संलग्नीत विभाग / महाविद्यालयात प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेशासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकानंतर विविध देशांच्या दुतावासात नियुक्त होणाऱ्या राजनैतिक

अधिकाऱ्यांच्या पाल्यांना व्हिएन्ना करारातील तरतुदीनुसार विद्यापीठात / संलग्नीत महाविद्यालयात प्रवेश घेण्यास अडचणी निर्माण होतात. तथापि, व्हिएन्ना कराराप्रमाणे जे राजनैतिक अधिकारी भारतात नियुक्त होतात त्यांच्या पाल्यांना राज्यातील शाळा / महाविद्यालयांमध्ये प्रवेश देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार तसेच संदर्भाधिन अर्ध शासकीय पत्रान्वये करण्यात आलेल्या विनंतीस अनुसरुन राज्यात नियुक्त होणाऱ्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या पाल्यांना प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर (कट ऑफ डेट) देखील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध अभ्यासक्रमांस प्रवेश घेण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u> उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विद्यापीठ / संलग्नीत /स्वायत्त महाविद्यालये/तंत्र निकेतने यामध्ये, भारतामधील विविध देशांच्या दुतावासात नियुक्त होणाऱ्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या पाल्यास व्हिएन्ना करारातील तरतुदीनुसार, प्रवेश देण्यास खालील अटींच्या अधीन राहून एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

१) व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया / काऊन्सिल ऑफ आर्किटेक्चर / एनसीटीई इत्यादींसारख्या केंद्र शासनाच्या शिखर संस्थांद्वारे परदेशी विद्यार्थ्यांसाठीचा कोटा मंजूर केला असल्यास केवळ त्याच महाविद्यालयात परदेशस्थ विद्यार्थ्यांकरिता असलेल्या मंजुर प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत प्रवेश देणे अनिवार्य असेल.

२) परदेशी विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी प्रथमत: संबंधित महाविद्यालयाकडे परस्पर अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच समांतरपणे संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किमान शैक्षणिक अर्हता व समकक्षतेसंबंधी विहीत अटी व शर्ती पूर्ण करीत असल्याची खात्री करुन घेण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे (CET CELL) / संबंधीत विद्यापीठाकडे अर्ज करणे क्रमप्राप्त असेल.

३) व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता अशाप्रकारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसंदर्भात आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडे सविस्तर माहिती महाविद्यालयांनी सादर करणे आवश्यक असेल.

४) व्यावसायिक अभ्यसक्रमांव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमांच्या प्रवेशास आवश्यकतेनुसार संबंधीत सक्षम प्राधिकारी अथवा विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक राहिल.

५) वरीलप्रमाणे प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर प्रवेश घेणाऱ्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या पाल्यांनी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत प्रसिध्दी माध्यमांव्दारे व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

२. सदर शासन निर्णय प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने निर्गमित करण्यात येत असून तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक सांकेतांक २०१७१११३१२३१३३३६०८ असा असून सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सिध्दार्थ खरात )
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे
५. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, शासकीय तंत्रनिकेतन इमारत ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१
६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, शासकीय तंत्रनिकेतन इमारत ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१
७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, शासकीय तंत्रनिकेतन इमारत ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१
८. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सहसचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
११. उपसचिव (मशि),उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
१३. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये
१४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
१५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
१६. निवड नस्ती/तांशि-४